## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे खेळाडू नचिकेत ठाकूर आणि तुषार चोरडीया या दोघांची भारतीय विद्यापीठाच्या क्रिकेट संघात निवड झाली आहे. दि . २५ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत मुंबई आणि भुवनेश्वर येथे ऑस्ट्रेलियन विद्यापीठ क्रिकेट संघाविरूध्द होणाऱ्या मालिकेत ते सहभागी होणार आहेत. भारतीय विद्यापीठ क्रिकेट संघात दोन खेळाडूंची निवड होण्याचा पाहिल्यांदाच मान कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला प्राप्त झाला आहे. या दोन्ही खेळाडूंचा प्रवास खर्च , प्रशिक्षण शिबिर व निवास भोजन यासाठी येणारा एकूण १ लाख ७६ हजार रूपयांचा खर्च तातडीने कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी विद्यापीठामार्फत करण्यास मंजुरी दिली आहे.

नचिकेत ठाकूर हा रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा तर तुषार चोरडीया हा भुसावळच्या पी.ओ.नाहाटा महाविद्यालयाचा विद्यार्थी आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात झालेल्या पश्चिम विभागीय क्रिकेट स्पर्धेत तसेच जे.जे.टी. विद्यापीठ, राजस्थान येथे झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा, बी.सी.सी.आय अंतर्गत आसाम येथे झालेल्या वीझी ट्रॉफी २०२३-२४ आणि भुवनेश्वर येथे झालेल्या निवड चाचणीत या दोन्ही खेळाडूंनी केलेल्या उत्तम कामगिरीच्या आधारावर त्यांची निवड झाली आहे. तुषार चोरडीया हा डावखुरा फलंदाज आणि उजव्या हाताचा मध्यम जलद गोलंदाज असा अष्टपैलू खेळाडू आहे. तर नचिकेत हा उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज आहे.

२५ नोव्हेंबर पासून मुंबई आणि भुवनेश्वर येथे ऑस्ट्रेलियन विद्यापीठ क्रिकेट संघाविरूध्द भारतीय विद्यापीठ क्रिकेट अशी मालिका होणार आहे. त्यामध्य हे दोघे सहभागी होतील त्यापुर्वी १८ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत भुवनेश्वर येथील केआयआयटी विद्यापीठात प्रशिक्षण शिबिरात हे दोघे सहभागी होतील. भारताचे नावाजलेले ५५ खेळाडून आजपर्यंत भारतीय विद्यापीठ क्रिकेट संघाकडून खेळले आहेत. त्यामध्ये सुनील गावस्कर, दिलीप वेंगसकर, मोहिंदर अमरनाथ, अजित वाडेकर, फारुख इंजिनिअर, अंशुमन गायकवाड, बिशनसिंग बेदी आदींचा समावेश आहे.

कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी या खेळाडूंसाठी प्रत्येकी ८८ हजार याप्रमाणे एकूण १ लाख ७६ रूपयांचा खर्च (प्रवास, शिबिर, निवास आदी) विद्यापीठामार्फत केला जाणार असल्याचे घोषित करून तातडीने या प्रस्तावाला मान्यता दिली. यापुर्वी जागतिक पातळीवर धावण्याच्या स्पर्धेत सहभागी झालेल्या धावपटू रिंकी पावरा हिचा खर्च देखील विद्यापीठाने केला होता. या दोन्ही क्रिकेटपटूंचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील तसेच क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

.............................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १३ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १३ (प्रतिनिधी) : अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात झालेल्या राज्यस्तरीय इंद्रधनुष्य सांस्कृतिक स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाला क्ले मॉडेलिंग व इन्स्टॉलेशन या ललित कला प्रकारात दोन सुवर्ण पदके प्राप्त झाली.

दि. ७ ते ११ नोव्हेंबर या कालावधीत अकोला येथील कृषी विद्यापीठात २०व्या राज्यस्तरीय इंद्रधनुष्य सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या देवा सपकाळे या विद्यार्थ्याला क्ले मॉडेलिंग या कला प्रकारात सुवर्णपदक प्राप्त झाले. तर इन्स्टॉलेशन मध्ये तौशिफ शेख, गौरी चौधरी, कुणाल जाधव व समय चौधरी या विद्यार्थ्यांनी भाग घेवून सुवर्णपदक प्राप्त केले. ललितकला प्रकारातील हे सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थी जळगावच्या मुळजी जेठा महाविद्यालयाचे विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांना पियुष बडगुजर व शशिकांत वडोदकर यांचे मार्गदर्शन लाभले विद्यापीठाच्या संघासोबत या स्पर्धेसाठी डॉ. मनोज पाटील व प्रा. सुचित्रा लोंढे हे संघ व्यवस्थापक म्हणून सहभागी होते. सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. राजेंद्र नन्नवरे, श्री. नंदकुमार बेंडाळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी अभिनंदन केले आहे.

.....................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १३ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी